आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - २३

परिपत्रक

क्रमांक :सीएलआर/सेल/आयुक्त/सात मुंबई १९ सप्टेंबर २००२

या कार्यालयांच्या असे निदर्शनास आले आहे की, बरेचशे किरकोळ देशी दारु विक्रेते सीएल-३ अनुज्ञप्तीधारक देशी मद्याची माहवार विक्री इतकी कमी दाखवतात की ज्यामुळे महिन्याचा खर्च उदा. अनुज्ञप्ती फी, विजेचे बिल, पाण्याचे बिल, मजूरांचा खर्च सुशोभिकरणाचा खर्च, कर, धंदयात गुंतविलेल्या रक्कमेवर व्याज इत्यादि खर्च विचारात घेता मद्याची विक्री वाढविल्याशिवाय सदरचा खर्च भागविता येत नाही व त्यामुळे विक्री करावर त्याचा आपोआप परिणाम होतो. सीएल-३ अनुज्ञप्ती बाबत खालील माहवार खर्च येत असून त्यात अनुज्ञप्ती शुल्काचा समावेश आहे.

| तपशिल | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|
| | महानगर | शहर | खेडे |
| अनुज्ञप्ती शुल्क | १०,००० | ६,००० | २,००० |
| मजूरांचा खर्च | ५,००० | ४,००० | ३,००० |
| चालवणाराची फी किंवा फायदा | ८,००० | ५,००० | ३,००० |
| कर,विक्री व पाणी | ३,००० | २,००० | १,००० |
| गुंतवणीकीवरील व्याज | ३,००० | २,००० | १,००० |
| एकूण | २९,००० | १९,००० | १०,००० |

आणि म्हणून सर्व सीएल-तीन अनुज्ञप्तीधारकांनी चांगल्या प्रकारे नफा मिळण्यासाठी दररोज कमीत कमी महानगरात १० पेटया, शहरी विभागात ८ पेटया तर लहान गावात / खेडयात ५ पेटया विक्री केली पाहिजे.

माझ्या असे लक्षात आले की आपल्या पैकी बरचसे प्रतिनिधी मद्याची विक्री इतकी कमी दाखवितात की ते दारु दुकान कसे चालवितात याचे स्पष्टीकरण देवू शकत नाहीत. माझ्या मते अनुज्ञप्तीधारक अवैधरित्या किंमत वाढविणे, पाणी मिसळविणे, अवैधरित्या कर चुकविलेले मद्य आणणे किंवा कमी परिमाणाचे मद्य पुरविणे इ. करीत आहेत.

क्र. सीएलआर.

सदर परिपत्रक निर्गमित करण्याचा उद्देश आपल्या अधिपत्याखालील सर्व प्रतिनिधीनी कर भरलेले मद्यावर नियत्रण ठेवावे असा असून या परिपत्रकाची अंमलबजावणी चालू महिन्यापासून अबकारी अधिकारी अंमलात आणतील.

मी आपल्या असेही निदर्शनास आणतो की जे मद्याची कमी विक्री दाखवतील त्यांचे विरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ मधील कलम ५४ चे अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

सदरच्या सुचना मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ मधील कलम ३ व ९ तसेच महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ मधील नियम ४७ व अनुज्ञप्तीच्या अटी नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

(ए.रामकृष्णन)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति
१) सर्व जिल्हाधिकारी याना सस्नेह.
२) सर्व विभागीय उप-आयुक्त राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क.
४) सर्व सीएल-३ अनुज्ञप्तीधारक (मार्फत : अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
५) सर्व सीएल-३ संघटना (मार्फत : अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क)
६) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
७) या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी
८) अभिलेख शाखा ५ प्रतीसह
९) आयुक्तांचे स्वीय सचिव २ प्रतीसह